आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१३ एप्रिल २०२५ - रविवार

ठळक बातम्या

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विशेष पदयात्रांचं आयोजन
- विदर्भाच्या विकासासाठी शासन वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
- टँकरचालकांच्या संपामुळे मुंबईत आपत्कालीन कायदा लागू करण्याचा महानगरपालिकेचा निर्णय, विहीर, कुपनलिका आणि टँकर अधिग्रहित करणार

आणि

- जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशाची आदरांजली

<><><><><>

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या एक दिवस आधी राज्यासह देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढली जात आहे.

आंबेडकर जयंतीनिमित्त युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. नरिमन पॉइंट पासून मंत्रालयातल्या आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले.

होल्ड बाईट- रक्षा खडसे...

आंबेडकर जयंतीनिमित्त ऐरोलीतल्या बाबासाहेबांच्या ज्ञानस्मारकाला भेट देणारी मोठी जनसंख्या विचारात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आलं आहे.

पालघर जिल्ह्यातही भीम पदयात्रा काढण्यात आली.

रत्नागिरीतल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणातून जयभीम पदयात्रा काढण्यात आली. संविधान उद्देशिकेच्या वाचनानंतर या पदयात्रेचा समारोप झाला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात जय भीम पदयात्रेचं उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झालं. या पदयात्रेत २५० विद्यार्थी स्वयंसेवक आणि विद्यापीठातले कर्मचारी मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

नांदेड आणि बीड इथंही आज जिल्हा प्रशासन, जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयानं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

परभणीत भीम पदयात्रा काढण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतीगृहातल्या विद्यार्थिनींनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन केलं. परभणी शहरात उद्या आंबेडकर जयंतीनिमित्त वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

गोंदियात आंबेडकर जयंती निमित्त बाईक रॅली काढत काढण्यात आली. या रॅलीची सुरवात गोंदिया शहराच्या भीम नगर ग्राउंड मधून करण्यात आली. उद्या आंबेडकर चौकात भव्य जयंती सोहळा साजरा करण्यात येणार आहे

धुळ्यात जय भीम पदयात्रा उत्साहात संपन्न झाली. पदयात्रेची सुरवात गरुड मैदान इथून झाली.

<><><><><>

राज्यातल्या शेतकऱ्यांना वर्ष २०२६ अखेर १२ तास मोफत वीजपुरवठा केला जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. वर्धा जिल्ह्यात आर्वी इथं ७२० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण आज फडणवीस यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. राज्यात विजेचे दर ५ वर्षांसाठी स्थिर करुन राज्यशासनाने वीज ग्राहकांना दिलासा दिल्याचं ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. पाणी आणि वीज पुरवठ्याकरता सरकारने हाती घेतलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. भूजल पातळी खोल जात असल्यामुळे शेतकऱ्यांना १० अश्वशक्तीचे कृषीपंप वापरण्याची परवानगी देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत सहभागी होण्याचं आवाहन यावेळी त्यांनी केलं. समृद्धी महामार्गामुळे

देशव्यापी दळणवळण व्यवस्थेत विदर्भ केंद्रस्थानी आला असून तिथं औद्योगिक विकास करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे असं ते म्हणाले.

<><><><>

देशभरात सध्या पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. या अंतर्गत गरोदर तसंच स्तन्यदा माता, आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं सकस आहार पुरवण्यावर भर दिला जात आहे. भंडारा जिल्ह्यात महिला आणि बालकल्याण विभाग तसंच जिल्हा आरोग्यविभागाच्या वतीनं या निमित्त विविध खेळांच्या माध्यमातून पोषक आहाराचं महत्त्व महिला आणि मुलांना समजावून देण्यात आलं.

अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून.....

व्हॉईस कास्ट- पीटीसी - भंडारा..

<><><><>

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या चैत्री पौर्णिमा यात्रेस गुढीपाडव्यापासून प्रारंभ झाला आहे. काल चैत्री महिन्याची पौर्णिमा असल्यानं तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची उन्हाच्या कडाक्यातही मोठी गर्दी झाली. सकाळी सहा वाजता अभिषेक-पूजा पार पडली तसंच देवीला धुपारती दाखवून महापूजा करण्यात आली. चैत्री पौर्णिमेनिमित्त देवीच्या गाभाऱ्यात विविध आकर्षक फुलांसह आंब्याची आरास करून सिंहासनाला आंब्याच्या मोहराची सजावट करण्यात आली होती.

दरम्यान, येरमाळा इथल्या येडेश्वरी यात्रेलाही काल प्रारंभ झाला, आज येडेश्वरी यात्रा महोत्सवातील चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम आहे, या निमित्ता भाविकांची मोठी गर्दी झाली आहे.

<><><><>

केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नवीन नियमावली विरोधात मुंबईतल्या टँकर चालकांचा संप सुरुच असल्यानं, मुंबई महानगरपालिका प्रशासनानं २००५ चा आपत्कालीन व्यवस्थापन कायदा लागू करायचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत पालिकेच्या वतीनं शहरातल्या सर्व विहिरी, कूपनलिका आणि खासगी पाणीपुरवठा करणारे टँकर्स अधिग्रहित केल्या जाणार आहेत. व्यापक जनहितासाठी हा निर्णय घेतल्याचं पालिकेनं म्हटलं आहे. या निर्णयामुळे आता खासगी गृहनिर्माण संस्था आणि इतरांना टँकरद्वारे सुरळीतपणे पाणीपुरवठा करणं शक्य होईल असं पालिकेनं म्हटलं आहे.

केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नवीन नियमावलीनुसार पालिकेनं विहीर आणि कूपनलिका धारकांना ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी नोटीस बजावली होती, मात्र त्यामुळे टूँकर चालकांना पाणी मिळवण्यात अडचण येऊ लागली होती. याविरोधात त्यांनी हा संप सुरु केला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर पाटील यांनी या नोटिसांना स्थगिती द्यायचे निर्देश दिले होते. मात्र यानंतरही टँकर चालकांनी अद्याप संप मागे घेतलेला नाही.

दरम्यान मुंबईतल्या नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय भूजल प्राधिकरणाचे नियम आणि टँकर चालकांच्या मागण्यांवर तातडीने तोडगा काढायची सूचना महानगर पालिकेला केली आहे.

<><><><>

जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्षं पूर्ण होत आहेत. या हत्याकांडात बळी पडलेल्या हुतात्म्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग मैदानावर भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्यांना आपण आदरांजली अर्पण करत असून भारताची जनता सदैव त्यांची ऋणी राहील. त्यांच्या प्रेरणेने भारताचा प्रत्येक नागरिक देशाच्या प्रगतीसाठी आपलं योगदान देत राहील, असं मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या शूरांचं अतुलनीय बलिदान कोरलं गेलं असून देश त्यांचा सदैव ऋणी राहील, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी शहिदांना आदरांजली वाहताना म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जालियनवाला बाग हत्याकांडातल्या शहीदांना आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग हत्याकांडात शहीद झालेल्यांचं बलिदान स्वातंत्र्य लढ्यातला एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांना हे बलिदान सदैव प्रेरणादायी राहील, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

१३ एप्रिल १९१९ हा दिवस देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील सर्वांत काळा दिवस असून ही घटना देशाच्या इतिहासातून कधीच पुसली जाऊ शकत नाही. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तमाम देशभक्त वीर हुतात्म्यांना आदरांजली, अशा शब्दांत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

नाशिक जिल्ह्यात लासलगावसह सर्व बाजार समित्यांत कांद्याच्या दरात मोठी घसरण होत असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. केंद्र सरकारने कांद्यावरचं २० टक्के निर्यातशुल्क हटवल्यानंतरही भाव चांगला मिळत नसल्यानं केंद्र सरकारने कांद्याला अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकरी संघटनांनी केली आहे. लासलगाव बाजार समितीमध्ये काल उन्हाळ कांद्याला कमीत कमी ५०० रुपये, जास्तीत जास्त १३०१ रुपये तर सरासरी ११२५ रुपये क्विंटल भाव मिळाला तर लाल कांद्याला कमीत कमी ३०० रुपये, जास्तीत जास्त ८८० रुपये तर सरासरी ७०० रुपये क्विंटल भाव मिळाला.

<><><><>

गोंदिया जिल्ह्यातल्या सडक अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यांमुळे कापणीसाठी आलेल्या मक्याचं नुकसान झालं आहे. या शेतकऱ्यांना अद्याप कुठलीही शासकीय मदत मिळालेली नाही.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं  राजस्थान रॉयल्सवर ९ गडी राखत विजय मिळवला. बेंगळुरुनं १७ षटक आणि ३ चेंडूत १७५ धावा केल्या. राजस्थान रॉयल्सनं निर्धारित २० षटकांत ४ बाद १७३ धावा केल्या होत्या. आजचा दुसरा सामना दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.  कोकणात हवामान कोरडं राहील.

//<><><><>//